IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# महाराष्ट्रातील ग्रामपंचायत निवडणूका 2021– एक विश्लेषण

प्रा. डॉ. आनंदराव शिंदे
लोकप्रशासन विभाग प्रमुख
कै. बा. पा. ए. महाविद्यालय, हणेगांव जि. नांदेड, महाराष्ट्र राज्य, भारत

**सारांश**

वास्तविक भारतातील अर्ध्याधिक लोकसंख्येचे वास्तव्य हे अजूनही ग्रामीण भागात आहे. देशातील ग्रामीण लोकसंख्येचे प्रतिनिधीत्व करणारी ग्रामपंचायत प्राचीन भारताचा एक समृध्द वारसा आहे. परंतु काळानुरुप तिच्या कार्यपध्दती आणि कारभारामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. गावाच्या विकासाचा केंद्रबिंदु असलेल्या ग्रामपंचायतीच्या राजकीय, प्रशासकीय आणि आर्थिक अंगाने उत्थानासाठी प्रयत्न करणे हे केंद्रीय सत्तेचे कर्तव्य ठरते. सत्तेच्या विकेंद्रीकरणातून केंद्र व प्रांतिय सरकारांनी विकासविषयक अनेक कार्य आणि जबाबदाऱ्या या स्थानिक पातळीवरील पंचायतराज संस्थाकडे प्रदत्त केलेल्या आहेत. अशा स्थितीत या संस्थाना जबाबदार आणि कार्यक्षम बनवणे अत्यावश्यक ठरते. पाटोदा, राळेगण सिध्दी, हिवरे बाजार ही ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ग्रामीण विकासाची काही प्रातिनिधीक तथा आदर्श उदाहरणे आहेत परंतु विकासाचा हा प्रयोग संपूर्ण महाराष्ट्रभर पोहचणे, त्याचा प्रचार आणि प्रसार होणे यासाठी सामुहिक आणि संघटीत प्रयत्नांची गरज आहे. ग्रामपंचायतींना आपला कारभार पार पाडण्यासाठी तथा गावाच्या सर्वांगीन विकासासाठी प्रातिनिधीक नेतृत्वाची गरज असते आणि ही गरज ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकांमधून पूर्ण होत असते. परंतु ग्रामपंचायतीची निवडणूक ही अलिकडे फार मोठी समस्या बनत चाललेली आहे असे दिसून येते. ग्रामपंचायतीच्या निवडणूका या गावाच्या अनुषंगाने एक अनिवार्य प्रकिया आहे. शिवाय निवडणूकाच्या निमित्ताने ती एक लोकशाहीची प्रयोगशाळा सुध्दा आहे. परंतु या निवडणूका विकासाच्या मुद्याऐवजी इतर अनेक कारणे व अविकासाच्या मुद्यांवर होत असताना दिसून येत आहेत. आणि खऱ्या अर्थाने हाच या गावातील लोकशाहीला असलेला मोठा धोका आहे. वास्तविक जोपर्यंत ग्रामपंचायतीच्या निवडणूकांमध्ये सुधारणा होणार नाहीत तोपर्यंत चांगल्या, विकासाभिमुख नेतृत्वाची अपेक्षा करता येणार नाही. कारण निवडणूकीच्या माध्यमातूनच गाव पातळीवरील ग्रामपंचायत आणि पंचायतराज संस्थामधील नेतृत्व प्रस्थापित आणि विकसित होत असते. त्यामुळे या निवडणूका निःपक्ष, पारदर्शी, भयमूक्त वातावरणात आणि कोणत्याही गैर मार्गाच्या अवलंबाशिवाय होणे ही काळाची गरज आहे.

**सूचक शब्द–** निवडणूका, लोकशाही विकेंद्रीकरण, पंचायतराज, आचार संहिता, घोडेबाजार, मतदान, आरक्षण.

## I. प्रास्ताविक

"पंचायत सरकारी इमारत की नींव है यदी यह नींव मजबूत ना होगी तो उस पर खडी इमारत कमजोर होगी।"1

देशातील ग्रामपंचायती विषयी पं. नेहरुजींनी काढलेले हे उदगार पंचायतराज व्यवस्थेचे महत्व अधोरेखित करतात. "लोकशाहीच्या पाठशाळा" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंचायतराज व्यवस्थेतील ग्रामपंचायत ही निम्न स्तरावरील अत्यंत महत्वाची संस्था आहे. प्राचीन काळापासून आपले अस्तित्व टिकवलेल्या ग्रामपंचायती या खऱ्या अर्थाने "हमारे गॉव में हमारी सरकार" या उक्तीला सार्थ ठरवतात. प्राचीन कालखंडापासून देशातील केंद्रीय व प्रांतीय शासन व्यवस्थेत अनेक बदल होत गेले. परकीय आक्रमणामुळे येथे असलेल्या अनेक बलाढय सत्ता नष्ट होत गेल्या, नवीन यंत्रणा आणि नवीन प्रशासकीय संरचना येथे रुढ झाल्या परंतु "पंच परमेश्वर" ही संज्ञा धारण केलेल्या ग्रामपंचायती मात्र सर्वकाळात तग धरुन राहिलेल्या दिसून येतात. प्राचीन काळापासून अनेक परकीय शासकांनी भारतात आपली साम्रज्य स्थापन केली परंतु गावपातळीवरील पंचायत प्रशासनामध्ये सहसा कोणी हस्तक्षेप केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे "स्वतंत्र" आणि "स्वायत्ता" असे स्वरुप राहिलेल्या ग्रामपंचायतीने आपला हजारो वर्षाचा वारसा टिकवून ठेवलेला दिसून येतो. आधुनिक काळात इंग्रजी राजवटीमध्ये सुध्दा इंग्रजांनी गाव पातळीवरील पंचायतराज व्यवस्थेत फारसा बदल अथवा हस्तक्षेप केलेला दिसत नाही. उलटपक्षी सुधारणांच्या अनुषंगाने या व्यवस्थेला बळकटी देण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला होता. स्वातंत्र्यानंतर लोकशाही विकेंद्रीकरण व तळागाळातील लोकांना सत्तेत सहभागी करुन घेण्याच्या उद्देशाने पंचायतराज संस्थाना बळकटी देण्याचा प्रयत्न झाला. 73 व्या घटना दुरुस्तीने तर पंचायतराज संस्था आणि ग्रामपंचायतीना विशेष दर्जा आणि स्थान प्राप्त झाले.

## II. विषय ओळख

गावातील लोकांना आपले प्रश्न आणि समस्या सोडविण्यासाठी ग्रामपंचायत निवडणूकांच्या माध्यमातून आपले प्रतिनिधी निवडून देण्याचा अधिकार देण्यात आला आहे. परंतु अलिकडील काळात ग्रामपंचायतीच्या निवडणूका खेडयातील स्वास्थ्य बिघडवताना दिसत आहेत. निवडणूकांच्या कारणांवरुन गाव–खेडयातील वातावरण बिघडत असून निवडणूकीच्या वादातून खून, हाणामाऱ्या होताना दिसून येत आहेत. ग्रामपंचायतीच्या निवडणूका हया अनेकांसाठी प्रतिष्ठेचा विषय बनत असून येणाऱ्या काळात या निवडणूका प्रशासन आणि समाजापुढे एक मोठे अव्हान निर्माण करणाऱ्या ठरतील असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. नुकत्याच जानेवारी 2021 मध्ये महाराष्ट्रात पार पडलेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणूकांचा अनुभव या दृष्टीने विचार करण्यास भाग पाडणारा आहे. त्यामुळे या निवडणूका आणि एकंदरीत ग्रामपंचायतीच्या अनुषंगाने येणाऱ्या काळात काही ठोस पाऊले उचलणे ही काळाची गरज ठरणार आहे. नुकत्याच पार पडलेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकांतील अनुभव, त्या आधारावर भविष्यात उभी असणारी अव्हाने आणि त्यावर काही उपाययोजना करता येतील का? या अनुषंगाने या शोध लेखाचे प्रयोजन आहे.

## III. तथ्य संकलन आणि संशोधन पध्दती

प्रस्तुत संशोधन विषयासाठी अन्वेषनात्मक, वर्णनात्मक आणि निदानात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील नांदेड जिल्हयात नुकत्याच जानेवारी 2021 मध्ये पार पडलेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणूकांच्या अनुषंगाने निवडणूक प्रक्रिया, प्रचार, प्रत्यक्ष मतदान, निवडणूक निकाल व निवडणूक काळात उमेदवार आणि मतदार यांच्या भूमिका आणि वर्तनाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. सदरील शोध लेखासाठी प्रत्यक्ष निरीक्षण, अनौपचारीक मुलाखती व भेटी या आधारावर संकलित झालेल्या तथ्य व माहितीचा आधार घेण्यात आला आहे. शिवाय वर्तमानपत्रे, बातम्या, सोशल मिडीया व दूरचित्रवाणीवरील प्रसारीत माहिती व तथ्यांचा आवश्यकतेनुसार वापर करण्यात आलेला आहे. तथ्य संकलनासाठी सोयिस्कर आणि सहेतूक नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

## IV. उद्दिष्टये

1. ग्रामपंचायत निवडणूक प्रक्रियेचा अभ्यास करणे.
2. ग्रामपंचायत निवडणूकीवर प्रभाव टाकणाऱ्या घटकांचे विश्लेषण करणे
3. ग्रामपंचायत निवडणूकीतील राजकीय पक्षांच्या सहभागाचा अभ्यास करणे.
4. ग्रामपंचायत निवडणूक 2021 च्या निकालाचे विश्लेषण करणे.

## V. गृहितके

1. ग्रामपंचायत निवडणूक प्रक्रियेवर प्रशासकीय नियंत्रणाचा अभाव आहे.
2. ग्रामपंचायत निवडणूकीवर जात–धर्माचा मोठा प्रभाव पडतो.
3. ग्रामपंचायत निवडणूकीवरील खर्च विनिर्दिष्ठीत मर्यादेत होत नसतो.
4. ग्रामपंचायत निवडणूकीत घोडे बाजाराला (Horce Trading) अधिक वाव असतो.
5. ग्रामपंचायत निवडणूकीची सर्वाधिक प्रेरणा ही वर्चस्व, प्रतिष्ठा आणि भ्रष्टाचाराची असते.

## VI. अभ्यासक्षेत्र

प्रस्तुत शोध लेखाचे अभ्यासक्षेत्र हे महाराष्ट्र राज्यातील अग्नेयकडे असलेला, तेलंगणा आणि कर्नाटक राज्याशी सिमावर्ती भागाला लागून असलेला नांदेड जिल्हा असून जिल्हयातील एकून 16 तालुक्यामधील 907 ग्रामपंचायतीच्या निवडणूका पार पडल्या. "जिल्हयातील मुदत संपलेल्या एकून 1015 ग्रामपंचायतीच्या निवडणूकीचा कार्यक्रम लागलेला होता. तथापि यातील 106 ग्रामपंचायती या बिनविरोध झाल्या तर 2 ग्रामपंचायतीच्या निवडणूका या सरपंच पदाच्या लिलाव व इतर प्रकरणामुळे ह्वद करण्यात आल्या होत्या. ग्रामपंचायतीच्या निवडणूका संबंधाने नांदेड जिल्हा हा राज्यात चर्चेचा विषय बनलेला होता. निवडणूका शांततेत पार पडल्या परंतु निवडणूकीच्या वादातून जिल्हयातील जाणापूरी, मुतन्याळ, जांभळी आदी गावामध्ये हाणामाऱ्या झाल्या."[2]

अभ्यासक्षेत्रातील प्रातिनिधीक स्वरुपात 16 ग्रामपंचायतीची निवड ही यादृच्छिक पध्दतीने करुन तेथील निवडणूक प्रक्रिया अभ्यासण्यात आली आहे. या ग्रामपंचायत क्षेत्रातील लोकप्रतिनिधी, उमेदवार, मतदार यांची सोयीस्कर आणि सहेतूक नमुना निवड पध्दतीने निवड करुन तथ्य संकलित करण्यात आली आहेत. समग्रातील नमुन्याचे प्रमाण हे ग्रामपंचायत क्षेत्रातील लोकसंख्या आणि ग्रामपंचायतीची सदस्यसंख्या या आधारावर निश्चित करुन अभ्यासासाठी पर्याप्त व प्रातिनिधीक नमुना निवडला जाईल याची खबरदारी घेण्यात आली आहे. प्राथमिक स्त्रोतातून संकलित केलेल्या माहिती व तथ्यांचे वर्गीकरण केल्यानंतर त्याचे इतर प्राप्त तथ्यांशी पडताळणी तथा प्रमाणिकरण करण्यात आले आहे. शिवाय अभ्यासाच्या सोयीनुसार या तथ्यांची सुसंगती ही मॅन्युअली करण्यात आली आहे.

## VII. ग्रामपंचायत निवडणूकीचा लेखा जोखा

राज्य निवडणूक आयोगाने महाराष्ट्रतील 34 जिल्हयातील सुमारे 14 हजार 234 ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकांचा कार्यक्रम घोषीत केला. मागील काळात कार्यकाल संपलेल्या व डिसेंबर अखेर कार्यकाळ संपत असलेल्या तसेच नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायतीसाठी हा एकत्र निवडणूक कार्यक्रम झाल्यामुळे राज्यातील हा एक मोठा निवडणूक सोहळाच होता. आघाडी सरकार सत्तेत आल्यानंतर ग्रामपंचायतीच्या या पहिल्याच निवडणूका होत्या. काही अपवाद वगळता संपूर्ण राज्यात ही निवडणूक शांततेत पार पडली परंतु मतमोजणीनंतर राज्यातील बऱ्याच गावात हाणामाऱ्या झाल्याच्या बातम्या प्रसार माध्यमातून आलेल्या दिसून आल्या.

कोष्टक क्र. 1
**ग्रामपंचायत निवडणूकीचा लेखा जोखा**

| | |
|---|---|
| निवडणूक जाहीर ग्रामपंचायती | 14234 |
| प्रत्यक्ष मतदान झालेल्या ग्रामपंचायती | 12711 |
| एकून प्रभाग | 46921 |
| एकून जागा | 125709 |
| प्रत्यक्ष उमेदवारी अर्ज | 356221 |
| अवैध नामनिर्देशन पत्र | 6024 |
| निवडणूकीतून माघार घेतलेले अर्ज | 97719 |
| बिनविरोध विजयी उमेदवार | 26718 |
| अंतिम निवडणूक रिंगणातील उमेदवार | 214880 |
| बिनविरोध ग्रामपंचायती | 1523 |
| राज्यभरात ग्रामपंचायती निवडणूक टक्केवारी | 79 टक्के |

स्त्रोतः Times now Marathi, 15 Jan. 2021

राज्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणूका या नेहमीच चुरसीने झालेल्या दिसतात. 15 जानेवारी 2021 रोजी सुमारे 12711 ग्रामपंचायतीच्या निवडणूका पार पडल्या. गाव पातळीवरील सामाजिक स्वाथ्य टिकवण्यासाठी खरेतर ग्रामपंचायतीच्या निवडणूका या बिनविरोध होणे आवश्यक ठरते. वरील कोष्ठकाचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की, राज्यात नुकत्याच पार पाडलेल्या ग्रामपंचायतीच्या बिनविरोध निवडणूकांची टक्केवारी ही केवळ 10.69 टक्के एवढीच आहे. तथापि सजग आणि जागरुक मतदाराचे उदाहरण म्हणून दुसऱ्या बाजूला या निवडणूकीत झालेली मतदानाची टक्केवारी होय. तब्बल 79 टक्के मतदानाची टक्केवारी ही लोकशाहीसाठी उत्साहवर्धक म्हणता येईल. नुकत्याच पार पडलेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणूकांमधील अनुभवावरुन काही निरीक्षणे नोंदवता येऊ शकतात.

### VIII. ग्रामपंचायत निवडणूकांत राजकीय पक्षांचा सहभाग

वास्तविक गाव पातळीवरील राजकारण हे गट–तट आणि पक्ष विरहित राहावे या हेतूने राजकीय पक्षांना या निवडणूकांपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. केंद्रीय व प्रांतीय सत्ता आणि ग्रामपंचायत यांच्यात विकासाच्या अनुषंगाने सुसंवाद रहावा व गावातील राजकाकरण हे पक्षनिरपेक्ष रहावे यासाठी राजकीय पक्षांचा नाकारलेला हस्तक्षेप योग्यच आहे. तरी परंतु अनेक नेतेमंडळीचे मुळ गाव तथा त्यांची ग्रामीण पार्श्वभूमी असल्यामुळे तेथील निवडणूक ही प्रतिष्ठेची बनत असते. अशा नेतेमंडळीमुळे त्या ठिकाणची निवडणूक ही वर्चस्वाची लढाई बनत असते. राजकीय पक्षांना या निवडणूकीपासून दूर ठेवले असताना मतमोजणीनंतर मात्र सर्वच पक्षांनी सर्वाधिक ग्रामपंचायती या आपल्याच पक्षाच्या असल्याचे जाहीर करुन टाकले आहेत. खरेतर राजकीय पक्षांचा व राज्य व केंद्रीय स्तरावरील नेतेमंडळीचा गाव पातळीवरील राजकारणात हा चंचूप्रवेश आणि हस्तक्षेप गावातील राजकारणाला वेगळे वळण देणारे ठरु शकतो. अशा मोठया नेत्याच्या प्रभावात झालेल्या निवडणूका या खऱ्या अर्थाने प्रातिनिधीक ठरु शकत नाहीत. नेत्यांमुळे या निवडणूका प्रतिष्ठेच्या बनतात तथा दबावतंत्राचा वापर झाल्यामुळे निवडणूका प्रातिनिधीक होत नाहीत. अशा नेत्यांच्या दबावाखाली झालेल्या निवडणूकांमधून नवीन नेतृत्व स्वतंत्रपणे विकसित होऊ शकत नाही.

### IX. ग्रामपंचायतीच्या निवडणूका आणि वादविवाद

महाराष्ट्रातील सहकारी संस्था, कारखाने आदी क्षेत्रातील राजकारणाचा अनुभव पाहता राजकारणाचे हे ग्रहण ग्रामपंचायतीला लागू नये ही अपेक्षा होती. परंतु वर्चस्व, प्रतिष्ठा, जात–पात यातून अनेक वाद–विवाद निर्माण होताना दिसून येत आहे. वैयक्तीक आणि स्थानिक वाद हे ग्रामपंचायतीच्या निवडणूकांत कळीचा मुद्या ठरत असतात. अशातून अनेकदा हाणामाऱ्या व भांडणे होताना दिसत आहेत. नुकत्याच पार पडलेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणूकांत राज्यातील अनेक भागात हाणामाऱ्या झाल्याच्या बातम्या आलेल्या आहेत. "जळगांव जिल्हयातील उमाळा येथे दोन गटातील वादातून तलवारीने हाणमाऱ्या झाल्या. तर नांदेड जिल्हयातील जाणापुरी, जांभळी, मुतन्याळ आदी गावात ग्रामपंचायतीच्या निवडणूक वादातून दोन गटात हाणामाऱ्या झाल्याच्या बातम्या प्रसार माध्यमातून आलेल्या आहेत."[3] निवडणूकांच्या कारणांवरुन अनेकदा गावातील सौहार्दाचे वातावरण कलुषित होत असते.

### X. आरक्षण सोडत व घोडेबाजार

महाराष्ट्रात ग्रामपंचायतीच्या निवडणूका जाहीर होण्याआधीच सरपंच पदाचे आरक्षण जाहीर करण्याची पध्दती रुढ होती. त्यानुसार "राज्यातील 34 पैकी 8 जिल्हयातील सरपंच पदाच्या आरक्षणाची सोडत निवडणूका आधीच करण्यात आली."[4] निवडणूकीपूर्वी आरक्षण सोडतीमुळे गावातील राजकारणाची आणि जातीय समिकरणांची जूळवाजूळव केली जाते. त्यामुळे निवडणूकी आधीच जातीय राजकारणाचा प्रभाव अर्थात उमेदवारीवर पडत असतो. शिवाय निवडणूकीनंतर लगेच घोडेबाजार तेजीत येत असतो. उमेदवारांची पळवापळव, वेगवेगळया प्रकारची अमिषे, त्यातून वादविवाद आणि हाणामाऱ्या घडत असतात. निवडणूकपूर्व आरक्षण सोडतीमुळे राजकीय मोर्चेबांधणील लवकर सुरुवात होऊन बाहय राजकीय हस्तक्षेप सुध्दा वाढू शकतो. तथापि "राज्याच्या ग्रामविकास विभागाने निवडणूकीपूर्वी सरपंच पदाच्या आरक्षण सोडतीची पध्दती रद्द केली आणि सोडत झालेल्या आठही जिल्हयातील आरक्षण रद्द करुन निवडणूकीनंतर ही सोडत होणार असल्याचे घोषित केले."[5] शासनाचे हे पाऊल ग्रामपंचायतीच्या निवडणूक सुधारणांच्या अनुषंगाने महत्वाचे ठरु शकते. निवडणूकीनंतर

आरक्षण सोडत झाली तर निवडणूका या खेळीमेळीच्या वातावरणात होऊ शकतात. आणि सरपंच पदाचा दावेदार आरक्षणाच्या आधारावर ठरण्यास मर्यादा येते.

**XI. थेट सरपंच निवड पध्दती**

मागील सरकारने ग्रामपंचायतीच्या सरपंचाची निवड ही सदस्यातून करण्यापेक्षा थेट गावातील मतदाराकडून करण्याचा निर्णय घेतला आणि "या प्रक्रियेतून राज्यातील सुमारे 7300 गावातील सरपंचाची निवड थेट जनतेतून झाली. परंतु राज्यात सत्तातंर झाल्यानंतर ही थेट सरपंच निवड पध्दती हद्द करुन पूर्ववत जनतेतून करण्याचा निर्णय घेण्यात आला."[6]

वास्तविक सरपंच निवडीच्या दोन्ही पध्दतीचे काही गुण दोष आहेत. थेट जनतेतील सरपंच विकासकार्य करण्यासाठी त्यास स्थैर्य आणि स्वायत्ता मिळत असते. त्याचा फायदा गावाच्या विकासासाठी होऊ शकतो. परंतु दुसऱ्या बाजूला असा थेट सरपंच हा गावचा हुकूमशहा सुध्दा बनू शकतो आणि इतर सदस्यांच्या हक्क आणि मताला काहीही स्थान मिळत नाही; ज्यामुळे गावातील लोकशाही धोक्यात येऊ शकते. खरेतर थेट सरपंच निवडीचा अनुभव काही काळ घेऊन या बाबतच्या परिणामांचा अभ्यास केल्यानंतर त्या बाबत पूर्नविचार करायला हरकत नव्हती. परंतु आघाडी सरकारने हा निर्णय घाई–घाईने घेतल्याचे दिसते.

**XII. तरुणाईचा सहभाग**

गावविकासाचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवू पाहणाऱ्या सक्षम, सुशिक्षित युवकांच्या हाती राजकारणाची धूरा देण्यावर आता ग्रामस्थांची मानसिकता झाल्याचे दिसून येते. राज्यात पार पडलेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत अनेक तरुण व नवतरुणांनी बडया–बुजूर्गांना धोबी पछाड दिल्याचे निवडणूक निकालांवरुन दिसते. एरव्ही गावपातळीवरील या राजकारणात तरुणांचा रस तेवढा दिसून येत नव्हता. परंतु या दृष्टीने या निवडणूकांमधील हे चित्र आशादायक म्हणता येईल. देशाचे उद्याचे नेतृत्व निर्माण करण्यामध्ये पंचायतराज संस्थांचे मोठे योगदान राहिलेले आहे. स्वर्गीय विलासराव देशमुख आणि आर. आर. पाटील हे या दृष्टीने उत्तम उदाहरण आहे. राज्य आणि राष्ट्राची भविष्यकालीन धूरा आजच्या नवतरुणांच्य हातात द्यावयाची असेल तर हे नेतृत्व परिपक्व होणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतीच्या निवडणूका, राजकारण आणि कार्यपध्दती यांच्या अनुभवातून हे नेतृत्व तयार होऊ शकते. त्यामुळे या निवडणूकीतील तरुणांचा सहभाग हा आशादायक मानता येईल.

**XIII. ग्रामपंचायत निवडणूकीत अवैध मार्गाचा अवलंब**

गावपातळीवर मतदान मिळवण्यासाठी पैसा, दारु व जेवण्याच्या पार्टयांचा उपयोग केला जात असल्याचे दिसून येत आहे. "पाटोदा येथील आदर्श सरपंच श्री भास्कर पेरे यांनी ग्रामपंचायत निवडणूकीत अशा प्रकारच्या दारुच्या वापरामुळे तरुणाई व्यसनाधिनतेकडे जात असल्याची खंत व्यक्त केली आहे."[7] निवडणूक विभागाकडे मर्यादीत मनुष्यबळ असल्यामुळे निवडणूक काळात गावपातळीवरील अशा अवैध बाबीकडे लक्ष पुरविणे शक्य होत नसल्याचे दिसते. विधानसभा आणि लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकांच्या वेळी ज्या पध्दतीने आदर्श आचार संहितेचे पालन होते; त्या पध्दतीने ग्रामपंचायतीच्या निवडणूकांमध्ये आदर्श आचार संहितेचे पालन होताना दिसून येत नाही. आदर्श आचार संहितेच्या पालनाची जबाबदारी गावातील तलाठी आणि ग्रामसेवकांवर असते परंतु ग्रामपंचायतीचा मतदार संघ (वार्ड) लोकसंख्या आणि भौगोलिकदृष्टया एवढा लहान असतो की, आचार संहितेचे पालन होण्यास अनेक अडचणी येतात. शिवाय ग्रामपंचायतीचा प्रचार हा अनौपचारिकरित्या होत असतो. त्यामुळे रात्री–अपरात्री होणाऱ्या गैरमार्गाला आळा घालणे यंत्रणेला अशक्यप्राय होते.

**XIV. ग्रामपंचायत निवडणूकीत निवडणूक विभागाची भूमिका**

लोकसभा आणि विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणूका प्रमाणेच किंबहुना त्याहून अधिक गावपातळीवर ग्रामपंचायतीची निवडणूक गावकऱ्यांसाठी अत्यंत महत्वाची वाटते. त्यामुळेच नेहमी या लढती चुरसीच्या आणि विक्रमी मताधिक्यांनी होताना दिसून येतात. महाराष्ट्रात नुकत्याच पार पडलेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणूकांत निवडणूक विभागाने अतिशय शिस्तबध्द पध्दतीने आपली कामगिरी बजावलेली आहे. पहिल्यांदाच राज्यात "ग्रामपंचायतीच्या निवडणूकीसाठी सातवी पासची अट लावली ती स्वागतार्ह आहे."[8] मतदान यंत्राद्वारे पार पडलेल्या या निवडणूकीत नोटाचाही पर्याय मतदारासाठी दिलेला होता. प्रभागनिहाय मतदान यंत्रात समाविष्ट केलेल्या प्रत्येक प्रवर्गाच्या खाली नोटाचा पर्याय दिलेला होता परंतु त्यामुळे अशिक्षित मतदारांमध्ये गोंधळाची स्थिती निर्माण झालेली होती. मतदान यंत्रामध्ये निशानीच्या चित्राचा आकार हा लहान असल्यामुळे वयोवृध्द मतदारांना त्याची अडचण होत होती. निवडणूक विभागाने मतदार जाणीव जागृतीच्या अनुषंगाने मतदान यंत्राबाबतची माहिती निवडणूकपूर्व काळात गावपातळीवर देण्याची आवश्यकता भासत होती. या निवडणूकीचे आणखी एक वैशिष्टये म्हणजे "जळगाव जिल्हयातील आरती पाटील ही तृतीय पंथी उमेदवार विजयी झाली असून तीच्या निवडीवर तथा लिंग प्रमाण्याबाबत निवडणूक विभागाने शिक्कामोर्तब केले आहे."[9] या निवडणूकीचा आणखी एक अनपेक्षित अनुभव म्हणजे "सरपंच व उपसरपंच पदाच्या लिलाव प्रकरणी नाशिक जिल्हयातील उमराणे व नंदूरबार जिल्हयातील खोंडमळी या ग्रामपंचायतीची निवडणूक प्रक्रिया निवडणूक विभागाने हद्द केली आहे."[10]

ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत पक्ष पध्दती नसल्यामुळे निवडूण येवून दुसऱ्या गटात जाणाऱ्या उमेदवारांवर अर्थात पॅनलमधून फुटून जाणाऱ्या उमेदवारांवर कार्यवाही करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कायद्यात स्पष्टता नसल्यामुळे फुटीच्या राजकारणावर नियंत्रण ठेवणे शक्य होत नाही. त्यासाठी निवडणूक विभागाकडे पॅनल नोंदणीची पध्दती नसल्यामुळे अनेकदा गावपातळीवरील राजकारणाला फुटीचा धोका निर्माण होताना दिसून येतो. निवडणूक सुधारणांच्या अनुषंगाने भविष्यात या बाबीकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक ठरते. मधल्या काळात याबाबत माध्यमात बातम्या आल्या होत्या परंतु शासन स्तरावर या बाबत निर्णय झाला नसल्याचे दिसते.

## XV. निष्कर्ष आणि उपाययोजना

प्रस्तुत अभ्यासाच्या उद्दिष्टांना अनुरुप संकलित झालेल्या तथ्यांच्या आधारे गृहितकांची पडताळणी ही उपरोक्त मुद्या आधारे झाली असून त्या आधारे काही निष्कर्ष आणि त्यावरील उपाययोजना पुढील प्रमाणे सांगता येतील.

1. लोकशाही सशक्तीकरणात ग्रामपंचायतीची महत्त्वपूर्ण भूमिका राहिलेली आहे. जानेवारी 2021 मध्ये महाराष्ट्रात पार पडलेल्या निवडणूकांमध्ये तब्बल 80 टक्के पर्यंत मतदानाची टक्केवारी पोहचलेली आहे. निवडणूकीतील हा मतदारांचा उदंड प्रतिसाद भारतीय लोकशाहीसाठी गर्वाची बाब आहे. निवडणूकीतील हा लोकसहभाग भारतीय लोकशाहीला उज्ज्वल भविष्याची ग्वाही देतो. नागरी स्थानिक शासनसंस्थाच्या तुलनेत ग्रामीण भागातील पंचायतराज संस्थाच्या निवडणूकीतील हा लोकसहभाग एक प्रकारे आदर्श वस्तुपाठ म्हणता येईल.
2. ग्रामपंचायतीच्या निवडणूका निवडणूक विभागाने ठरवून दिलेल्या खर्चाच्या मर्यादेत होताना दिसून येत नाहीत. अलिकडील काळात शहरांशी लगत असलेल्या गांवामध्ये विशेषतः ग्रामीण ते शहरी संक्रमणशील असलेल्या गावामधील प्रचार खर्च वाढीव स्वरुपाचा होताना दिसून येत आहे. निवडणूक विभागाने प्रचार खर्चाची उमेदवाराला दिलेली 25000 ते 50000 रुपयांची मर्यादा वाढविणे आवश्यक आहे. खरेतर नेमून दिलेल्या खर्च मर्यादेपेक्षा उमेदवारांचा खर्च अधिकचा होताना दिसून येतो. यात वैद्य आणि अवैद्य या दोन्ही मार्गाचा समावेश होतो; तरी परंतु या खर्चावरील नियंत्रणासाठी निवडणूक विभागाकडे यंत्रणेचा अभाव असल्याचे दिसून येते.
3. ग्रामपंचायत निवडणूकतील उमेदवारांची पळवापळव व घोडेबाजार रोखण्यासाठी पक्षातंर बंदीच्या धर्तीवर कायदा होणे अपेक्षित आहे. राजकीय पक्षांना ग्रामपंचायतीच्या निवडणूकांत प्रवेश नाकारला असला तरी पॅनल नोंदणी आणि त्या आधारे एका गटातून दुसऱ्या गटात जाणाऱ्या आणि घोडेबाजार प्रवृत्तीला आळा घालता येऊ शकते. वर्तमान पॅनल नोंदणीची प्रक्रिया तितकीशी कडक नसल्यामुळे तथा गावपातळीवर अनौपचारिक पॅनल निश्चिती होत असल्यामुळे निवडणूकीनंतर होणाऱ्या पक्षांतरावर अथवा गटांतरावर निवडणूक विभागाला लक्ष ठेवणे अथवा अशा बाबीवर कार्यवाही करणे शक्य होत नाही ही वस्तुस्थिती आहे.
4. ग्रामपंचायत निवडणूकीवर सर्वाधिक प्रभाव टाकणारा घटक म्हणजे जात. जातीच्या समिकरणावर विजयाची गणिते ठरत असल्यामुळे जातिअंताची लढाई या निवडणूकांच्या निमित्ताने ग्रामीण भागात दुबळी ठरताना दिसून येत आहे. एरव्ही ग्रामीण भागात अठरापगड जाती गुण्यागोविंदाने नांदत असतात परंतु ग्रामपंचायत निवडणूकीच्या निमित्ताने निवडणूका जिंकण्यासाठी जाणीवपूर्वक जातीय अस्मिता जागे केली जाते. त्यामुळे जातीय सलोखा टिकून राहत नाही. यावरील उपाय म्हणजे ग्रामीण समाजातील जाणीवजागृती करणे हा आहे.
5. ग्रामपंचायत निवडणूकीत आदर्श आचरसंहिताचे कडक पालन होत नाही. ग्राम पंचायत निवडणूकीचे क्षेत्र अगदी लहान असल्यामुळे निवडणूकी दरम्यान वॉर्डात होणारे अवैद्य तथा गैरप्रकार याच्यावर प्रशासनाला लक्ष पुरविणे शक्य होत नाही. रात्रीच्या समयी दारु, खाण्या–पिण्याच्या पाटर्या, पैसा आदी अमिषे देऊन मतदारांना फसवण्याचा प्रकार अनेकदा होताना दिसून येतो. ग्रामपंचायतीच्या निवडणूका या भयमूक्त वातावरणात तसेच गटबाजी आणि वादविवादाशिवाय होणे ही काळाची गरज आहे. या अनुषंगाने भविष्यात निवडणूक विभागाला महत्वाची भूमिका बजवावी लागणार आहे. आदर्श आचार संहितेचे पालन होण्यासाठी निवडणूक विभागाने निरीक्षक नेमणे, अवैध मार्गाला पायबंद घालणे, निवडणूक काळात दारुची दुकाने बंद ठेवणे मतदारांमध्ये जाणीवजागृती घडवणे आदी कार्य हाती घेणे आवश्यक ठरते
6. महाराष्ट्रातील काही सन्मानीय ग्रामपंचायतीचा अपवाद वगळता बहुतांश ग्रामपंचायतीच्या भ्रष्टाचाराची प्रकरणे नेहमी वर्तमानपत्रात पहावयास मिळतात. ग्रामपंचायतीच्या निवडणूकांमध्ये दारु, पैसा अशा वाममार्गाचा वापर होण्याची प्रेरणा ही निवडून आल्यानंतर भ्रष्टाचारीची असू शकते. कारण निवडणूकांमध्ये टाकलेला पैसा वसूल करणे ही सहजप्रवृत्ती अशा माध्यमातून निवडून आलेल्या उमेदवार व पदाधिकाऱ्यांची असणे स्वभाविक आहे. चौदाव्या वित आयोगातून थेट निधी मोठया प्रमाणात ग्रामपंचायतीकडे वर्ग होत असल्यामुळे अनेक भ्रष्टाचारी प्रवृत्तीच्या लोकांना ही संधी वाटत आहे. त्यामुळे यापुढे ग्रामपंचायतीच्या खर्चाचे अकॉउंट आणि ऑडीट अधिक पारदर्शी होणे अत्यंत आवश्यक आहे.

## समारोप

ग्रामपंचायत ही ग्रामविकासाचा कणा आहे तसेच ती भारतीय लोकशाहीची आधारशीला आहे; जिच्या पायावर संपूर्ण भारतीय प्रशासनाची इमारत उभी आहे. वास्तविक ग्रामपंचायती या सक्षम, सुदृढ, विकासाभिमुख असणे अत्यंत आवश्यक आहे. अशा परिस्थितीत ग्रामपंचायतीचे सदस्य आणि आणि मुख्य म्हणजे सरपंच हा सुशिक्षित, समजदार, आणि विकासाचे ज्ञान असलेला आणि विकासासाठी प्रेरित असलेला पाहिजे. त्यासाठी आवश्यक आहे ती ग्रामपंचायत आणि सरपंच यांची योग्य निवड. सरपंच हा हुशार आणि कार्यक्षम असेल तर गावासाठी नीधी खेचून आणु शकतो. त्याच बरोबर अनेक योजना आणि कार्यक्रम राबवू शकतो. परंतु अनेक गावातील सरपंच अंगठेबहाद्दर आहेत. राज्याच्या ग्रामविकास विभाग ग्रामपंचायतीमध्ये निवडूण आलेल्या सरपंच व सदस्यांना प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम हाती घेत असल्याच्या बातम्या येत आहेत. ही बाब चांगली आहे. भविष्यात याचा फायदा नवख्या पदाधिकाऱ्यांना होऊ शकतो. तरी परंतु बऱ्याच गावातील सरपंचाना आपले पद टिकवण्यासाठी, सदस्यांची मनधरणी करण्यामध्ये वेळ, पैसा आणि श्रम वाया घालावे लागतात हा अनुभव आहे. या वरील उपाय म्हणजे गावातील मतदारांमध्ये जाणीवजागृती होणे हाच आहे. जाती–पातीच्या पलिकडे जाऊन विचार करणारी गावात राजकीय संस्कृती रुजणे आणि चुकीच्या अर्थात ग्रामविकासाच्या प्रक्रियेला बाधीत करणाऱ्या लोकांना निवडणूकीच्या माध्यमातून ग्रमपंचायतीच्या राजकारणापासून दूर करणे हाच सर्वाधिक चांगला पर्याय आहे.

**संदर्भ**


1. नेहरु ज., 1965, सामुदायिक विकास एवं पंचायतराज, सस्ता साहित्य प्रकाशन, दिल्ली, पृ. क्र. 104
2. www.esakal.com Date. 20 Jan. 2021
3. www.lokshainews.com Date. 16 Jan. 2021
3. दै. लोकमत, जळगांव आवृत्ती, पृ. क्र. 3, दि. 16 डिसेंबर 2020
4. एबीपी माझा, न्युज वाहिनी, सातच्या बातम्या, 15 डिसेंबर 2020
5. महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार, वर्ष 6, अंक 9, दि. 5 मार्च 2020
6. दै. लोकमत, औरंगाबाद आवृत्ती, पृ. क्र. 4, दि. 14 जानेवारी 2021
7. टि. व्ही 9 मराठी, न्युज वाहिनी, प्राईम टाईम, दि 25 डिसेंबर 2020
8. झी 24 तास, न्युज वाहिनी, सातच्या बातम्या, दि. 18 जानेवारी 2021
9. टि. व्ही 9 मराठी, न्युज वाहिनी, प्राईम टाईम, दि 13 जानेवारी 2021